आगोंद कारवाई विरोधात निषेध मोर्चा! पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

चित्ररथ स्पर्धेत दुर्भाटच्या त्रिवेणी कला संघ प्रथम पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २५ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 202 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 25 March 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

न्यायमूर्ती वर्मा यांची बदली

नवी दिल्ली, दि. २४ : दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागल्याच्या घटनेमुळे बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याची घटना नुकतीच समोर आली होती. या संपूर्ण प्रकरणाची देशभरात मोठी चर्चा रंगली. या घटनेमुळे न्यायाधीश वर्मा यांनी हे देखील चर्चेत आले. मात्र, हे सर्व आरोप यशवंत वर्मा यांनी फेटाळून लावले. तसेच आपल्याला फसवण्याचे आणि बदनाम करण्याचं हे षड्यंत्र असल्याचे त्यांनी म्हटले होते. या प्रकरणात अंतर्गत चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाने तीन सदस्यांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. दरम्यान, आगीत जळालेल्या नोटांचे तुकडे आढळून आल्यानंतर चर्चेत आलेले दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या बदलीची शिफारस करण्यात आली आहे. सुप्रीम कोर्टाच्या कॉलेजियमने यशवंत वर्मा यांच्या बदलीची शिफारस केली आहे. दिल्ली उच्च न्यायालयातून त्यांना आता अलाहाबाद उच्च न्यायालयात पाठवण्यात आले आहे.

खासदारांच्या पगारात घसघशीत वाढ

नवी दिल्ली, दि. २४ : सरकारने खासदारांच्या पगारात २४ टक्के वाढ केली आहे. संसदीय कामकाज मंत्रालयाने सोमवारी याबाबतची अधिसूचना जारी केली. यानुसार, सध्याच्या खासदारांना आता दरमहा १.२४ लाख रुपये वेतन मिळेल. पूर्वी त्यांना दरमहा १ लाख रुपये मिळत होते.

ही वाढ खर्च महागाई निर्देशांकाच्या आधारे करण्यात आली आहे. वाढीव पगार १ एप्रिल २०२३ पासून लागू होईल. याआधी २०१८ मध्ये मोदी सरकारने दर पाच वर्षांनी खासदारांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेण्याचा नियम बनवला होता. हा आढावा महागाई दरावर आधारित आहे. दैनिक भत्ता आणि पेन्शनमध्येही वाढ करण्यात आली आहे. दैनिक भत्ता २००० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला आहे. माजी खासदारांचे पेन्शन दरमहा २५,००० रुपयांवरून ३१,००० रुपये करण्यात आले आहे.

पाच वर्षांहून अधिक काळ खासदार राहिलेल्या सदस्यांना मिळणारे अतिरिक्त पेन्शनही दरमहा २००० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आले आहे.

पोप फ्रान्सिसना रुग्णालयातून डिस्चार्ज

नवी दिल्ली, दि. २४ : कॅथोलिक ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांना ५ आठवड्यांनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. यानंतर त्यांनी रुग्णालयाच्या बाल्कनीतून समर्थकांचे आभार मानले.

फुफ्फुसाच्या संसर्गामुळे ८८ वर्षीय पोप यांना १४ फेब्रुवारी रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर न्यूमोनिया आणि अशक्तपणाचा उपचारही सुरू होता. उपचारादरम्यान, कॅथोलिक चर्चचे मुख्यालय असलेल्या व्हॅटिकनने म्हटले होते की पोपच्या रक्त तपासणी अहवालात मूत्रपिंड निकामी होण्याची लक्षणे दिसून आली. याव्यतिरिक्त, प्लेटलेट्सची कमतरता देखील आढळून आली. रुग्णालयातून बाहेर पडल्यानंतर, पोप व्हॅटिकन सिटीमधील त्यांच्या घरी, कासा सांता मार्टा येथे परततील. व्हॅटिकनला परतल्यानंतर फ्रान्सिसला आणखी दोन महिने विश्रांतीची आवश्यकता असेल. पोपच्या डॉक्टरांनी सांगितले की उपचारादरम्यान दोन वेळा त्यांच्या जीवाला धोका होता, परंतु सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ९०,४५० (१० ग्रॅम)

चांदी : ₹१,१०,००० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७७,९८४ .३८ ↑ (१३०७.९५)

निफ्टी : २३,६५८.३५ ↑ (३८३.१३)

पाणीपुरवठा सुधारण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

दररोज किमान ४ तास पाणीपुरवठा देणार | राज्यात ५० एमएलडी पाण्याची कमतरता

■ टीम दैनिक हेराल्ड :

पणजी, दि. २४ : राज्यातील पाणीपुरवठ्याची स्थिती सुधारण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील असून, नागरिकांना दररोज किमान चार तास पाणीपुरवठा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी विधानसभेत स्पष्ट केले. राज्यातील पाणी समस्येवर लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असता, त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. ही सूचना आमदार मायकल लोबो, विरोधी पक्षनेते युरी आलेमाव आणि आमदार विजय सरदेसाई यांनी संयुक्तपणे मांडली होती.

मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली की, राज्याला प्रतिदिन ६९५ एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्ष पाणीपुरवठा केवळ ६३२ एमएलडी इतकाच होत आहे, त्यामुळे सुमारे ५० एमएलडी पाण्याची कमतरता जाणवत आहे. मात्र, या स्थितीवर उपाययोजना करण्यात येत असून, सर्व नागरिकांना नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. सध्या राज्यभरात भूमिगत वीज वाहिन्या व केबल टाकण्याचे काम सुरू असल्याने काही ठिकाणी जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत आहेत, मात्र त्यांची त्वरित दुरुस्ती केली जात असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील अनधिकृत बोअरवेल्सवर सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. काही बोअरवेल्स सील करण्यात आल्या असून, संबंधितांवर ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात आला आहे. बोअरवेलची सक्तीने नोंदणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, तसे न केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच तळी किंवा नैसर्गिक जलस्रोत बुजवण्याच्या प्रयत्नांवर कठोर पावले उचलली जातील,असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

राज्यात कार्यरत असलेल्या पाण्याच्या टँकरांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली असून, यात खासगी टँकरांचाही समावेश असेल. तसेच हे टँकर कोणत्या ठिकाणाहून पाणी भरतात याचीही नोंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मे २०२६ नंतर एप्रिल व मे महिन्यांत पाणीटंचाई जाणवणार नाही यासाठी सरकार विशेष नियोजन करीत आहे. यासाठी २४८ एमएलडी अतिरिक्त पाणी पुरवठ्याची आवश्यकता असून, त्यादृष्टीने आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यातील आगामी मोठ्या प्रकल्पांमुळे पाणीटंचाई वाढण्याची भीती विरोधकांनी व्यक्त केली. तसेच, अनेक हाउसिंग प्रकल्पांमध्ये चालू असलेल्या स्विमिंग पूलसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे होणारा पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अशी मागणी विरोधी पक्षांनी केली.

ओल्ड गोवा बफर झोनमध्ये बांधकामांना परवानगी नाही

टीम दैनिक हेराल्ड

▶ मंत्री विश्वजित राणेंकडून स्पष्ट : झाडे तोडणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाणार

पणजी, दि. २४ : जुने गोवा वारसा स्थळाच्या बफर झोनमध्ये कोणत्याही प्रकारच्या नवीन बांधकामांना परवानगी दिली जाणार नाही, असे टाउन अँड कंट्री प्लॅनिंग (टीसीपी) आणि वनमंत्री विश्वजित राणे यांनी स्पष्ट केले आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री राणे म्हणाले की, जुन्या गोव्यात कोणत्याही नवीन बांधकाम परवानग्या दिल्या गेल्या नाहीत. ज्या काही मंजुरी दिल्या गेल्या आहेत, त्या केवळ चर्च संकुलातील सुविधा केंद्र आणि पायाभूत सेवांसाठीच आहेत. केवळ भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण परवानगीसह काही प्रकल्पांना मान्यता दिली आहे. मी मंत्री झाल्यानंतर बफर झोन अधिसूचित करण्यात आला. त्यामुळे तो झोन हटवण्याचा कोणताही प्रश्नच उद्‌वतच नाही. जुने गोवा हे महत्त्वाचे वारसा स्थळ आहे आणि त्याच्या १०० मीटरच्या आत कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे सांगितले की, टीसीपी मंत्री असताना बफर झोनसाठी अधिसूचना जारी करण्यात आली. त्याआधी कोणीही ही अधिसूचना काढण्याचे धाडस केले नव्हते. त्यामुळे, बफर झोनमधील कोणत्याही बांधकामाला आम्ही परवानगी देणार नाही. तसेच, झाडे तोडणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल. विधानसभेत या मुद्द्यावर आमदार वेंझी व्हिएगस यांनी टीसीपी विभागावर प्रश्न उपस्थित केला. त्यांनी दावा केला की, टीसीपीने १२ मे २०२३ रोजी पर्यटन विभागाला ना हरकत प्रमाणपत्र' दिले होते आणि ती रद्द करावी. आम्हाला सांगण्यात आले की जुन्या गोव्यात कोणत्याही बांधकामाला मंजुरी दिली गेली नाही. मात्र, टीसीपीने पर्यटन विभागाला एनओसी दिल्याचे स्पष्ट झाले आहे. जर ही परवानगी दिली असेल, तर ती त्वरित रद्द केली जावी, असे व्हिएगस यांनी विधानसभेत सांगितले.

ओल्ड गोवा ग्रामपंचायतीचे कार्यवाहक सरपंच अंबर आमोणकर पान २ ▶

ओल्ड गोव्यातील वादग्रस्त काम थांबवले

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २४ : जुन्या गोव्यातील बॉम जीझसच्या बॅसिलिकाजवळ सुरू असलेले काम तातडीने थांबवण्यात आले आहे. उत्खननादरम्यान तोफगोळे सापडल्याने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने (एएसआय) पर्यटन विभागाला काम स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यटन विभागाने या स्थळी मॉल उभारण्याच्या शक्यतेला स्पष्टपणे नकार दिला असला तरी, हा प्रकल्प पर्यटन सुविधा वाढवण्यावर केंद्रित असल्याचे सांगण्यात आले आहे.

शनिवारी एएसआयने पर्यटन विभागाला पत्र लिहून उत्खननाचे सखोल दस्तऐवजीकरण करण्यासाठी वेळ लागणार असल्याचे सांगितले. एएसआयचे सहाय्यक अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. किशोर रघुबंस यांनी स्पष्ट केले की,उत्खनन प्रक्रियेदरम्यान काही तोफगोळे सापडले असून, त्यांच्या नोंदी करणे आवश्यक आहे. यासाठी छायाचित्रण, रेखाचित्रे आणि अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून, यास दोन ते तीन महिने लागतील. त्यानंतर पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल.

पर्यटन संचालक केदार नाईक यांनी स्पष्ट केले की, या प्रकल्पांतर्गत तीन महत्त्वाचे घटक आहेत . पर्यटक सुविधा वाढवणे, १०० कार व २०० दुचाकींसाठी पार्किंग विकसित करणे, तसेच माहिती केंद्र आणि स्मारकासाठी सुधारित प्रकाशयोजना. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या प्रसाद (तीर्थयात्रा पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक वृद्धी मोहीम) योजनेंतर्गत राबवला जात आहे. त्यांनी पुढे सांगितले की, पर्यटन विभागाने ५० झाडे तोडण्याची परवानगी मागितली होती, मात्र वन विभागाने केवळ २५ झाडे तोडण्यास मान्यता दिली आहे. पर्यटन विभागाच्या मालकीच्या १४ हजार चौरस मीटर जमिनीपैकी केवळ ८ हजार ५०० चौरस मीटर जागेचा नियोजित विकास केला जाणार आहे.

पर्यटन विभागाने सर्व आवश्यक परवानग्या घेतल्या असून, ओल्ड गोवा ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) मिळवण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे. मात्र, ग्रामपंचायतीने अद्याप एनओसी जारी केलेली नाही, असे नाईक यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पांतर्गत स्मारकाच्या दर्शनी भागावर रोषणाई, पर्यटकांसाठी चार्जिंग स्टेशनसह ई-ऑटो सेवा, आरामदायी बसण्याची व्यवस्था आणि सुधारित फलक बसवले जाणार आहेत. प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च १७ कोटी रुपये असून, चर्च अधिकारी, ग्रामपंचायत, एएसआय आणि नगर व देश नियोजन विभागाशी समन्वय साधून सुधारणा करण्यात आल्या आहेत. एएसआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्टीलच्या बाकांच्या जागी लाकडी बाक बसवण्यात येणार आहेत, असे नाईक यांनी सांगितले.

केपेचे आमदार अल्टोन डिकॉस्टा यांनी या प्रकल्पावर विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. त्यांनी वारसा स्थळापासून १०० मीटर अंतरात कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी नाही, असे नमूद करत हा प्रकल्प थांबवण्याची मागणी केली. या सूचनेवर पर्यटन मंत्री रोहन खंवटे मंगळवारी उत्तर देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

शैक्षणिक वर्षाचा फैसला २७ मार्चनंतरच

सरकारने हरकती नोंदवण्याची मुदत वाढवली

टीम दैनिक हेराल्ड

सरकारने या संबंधात तयार केलेल्या मसुदा अधिसूचनेवर पालकांकडून आणि संबंधितांकडून २७ मार्चपर्यंत हरकती मागविल्या आहेत. त्यानंतर शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासंदर्भातील अधिसूचना केव्हाही निघू शतके. सरकारने तयार केलेल्या मसुदा अधिसूचनेत पहिली ते पाचवी आणि अकरावीचे वर्ग जूनपासून सुरू होतील. तर सहावी ते दहावी आणि बारावीचे वर्ग एप्रिलमध्ये सुरू होतील.

– देविदास पांगम, ॲडव्होकेट जनरल.

पणजी, दि. २४ : मुंबई उच्च न्यायालयाने १ एप्रिल रोजी शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासंदर्भात दाखल याचिका निकाली काढली असून , राज्य सरकारकडून २७ मार्चनंतर नवीन अधिसूचना काढली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या नव्या नियमांमध्ये शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच्या तारखांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

महाधिवक्ता देविदास पांगम यांनी दिलेल्या माहितीनुसार, इयत्ता सहावी ते दहावी आणि बारावीचे वर्ग एप्रिल २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होतील, तर इयत्ता पहिली ते पाचवी आणि अकरावीचे वर्ग जून महिन्यात सुरू होणार आहेत. तसेच प्रत्येक वर्गाला किमान एक महिन्याची उन्हाळी सुट्टी मिळणार आहे.

याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. विवेक रॉड्रिग्ज यांनी सोमवारी सांगितले की, न्यायालयाने महाधिवक्त्यांनी दिलेल्या विधानाच्या आधारावर आदेश पारित केला आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयासमोर युक्तिवाद केला की राज्य सरकार शालेय शिक्षण कायद्याच्या कलम २९ मधील आवश्यक तरतुदींचे पालन करण्यात अपयशी ठरले आहे, विशेषतः शैक्षणिक कॅलेंडरमधील बदलांसंदर्भात आवश्यक सूचनांच्या संदर्भात.

न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, गोवा शिक्षण नियम १९८६ अंतर्गत नियम २१ मध्ये करण्यात आलेल्या मसुदा सुधारणेस आक्षेप नोंदवण्यासाठी केवळ ५ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, जो पुरेसा नाही. यावर महाधिवक्त्यांनी सहमती दर्शवली असून, सरकारने २७ मार्च २०२५ पर्यंत आक्षेप स्वीकारण्यास संमती दर्शवली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, सुधारित मसुद्यात शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवसानंतर वर्ग सुरू होण्यासाठी किमान सात दिवसांचा अंतर आवश्यक राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, नवीन अधिसूचनेला आव्हान देण्याचा याचिकाकर्त्यांचा अधिकार अबाधित राहील, असे ॲड. रॉड्रिग्ज यांनी सांगितले. न्यायालयाच्या निर्णयानंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी प्राप्त आक्षेपांचा विचार करून शाळा सुरू होण्याची निश्चित तारीख जाहीर केली जाईल.

या निर्णयाचे स्वागत करताना ॲड. विवेक रॉड्रिग्ज यांनी याला याचिकाकर्ते आणि व्यापक समाजाच्या दृष्टीने एक मोठा विजय ठरवला आहे. न्यायालयाचा हा आदेश पारदर्शकता, जबाबदारी आणि कायद्याचे शासन यासारख्या मूलभूत तत्त्वांना पाठिंबा देणारा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बेकायदेशीर एलईडी मासेमारी बोट जप्त

गोवा नोंदणीकृत बोटीवर पहिलीच कारवाई

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २४ : गोवा मत्स्यव्यवसाय विभाग आणि सागरी पोलिस दलाने रविवारी रात्री शापोरा किनाऱ्याजवळ बेकायदेशीर एलईडी मासेमारी उपकरणांचा वापर करणाऱ्या सावित्री या मासेमारी बोटीवर कारवाई करत ती जप्त केली. गोव्यातील नोंदणीकृत बोटीवर झालेली ही पहिली मोठी कारवाई असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अलीकडच्या काळात परराज्यातील मासेमारी नौका तसेच गोव्यातील काही स्थानिक बोटी मासेमारीसाठी एलईडी दिव्यांचा अवैध वापर करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर हा छापा टाकण्यात आला.

तपासादरम्यान अधिकाऱ्यांना जहाजात उच्च क्षमतेचा जनरेटर आणि शक्तिशाली एलईडी दिवे आढळले. समुद्री पर्यावरणावर होणाऱ्या घातक परिणामांमुळे आणि मत्स्यसंपत्तीच्या संरक्षक नियमांनुसार अशा प्रकारच्या मासेमारीवर सक्त बंदी आहे. प्राथमिक तपासात सावित्री ही सहाय्यक प्रकाश जहाज म्हणून कार्यरत असल्याचे आढळले, जी मोठ्या मासेमारी मोहिमांसाठी प्रकाशपुरवठा करत होती.

मत्स्यव्यवसाय मंत्री नीलकंठ हळर्णकर यांनी याप्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. गोव्याच्या समुद्री संसाधनांचे रक्षण करणे ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

गोव्याच्या पारंपरिक मच्छीमार संघटनांनी मत्स्यव्यवसाय विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोयचो रापोंणकारांचो एकवोट या संघटनेने एलईडी मासेमारीला आळा घालण्यासाठी वारंवार मागणी केली होती. १९ मार्च रोजी त्यांनी मत्स्यव्यवसाय विभागाकडे औपचारिक तक्रार दाखल केली होती, ज्यात बेकायदेशीर मासेमारी पद्धतींमुळे माशांच्या साठ्यावर होणाऱ्या विनाशकारी परिणामांचा उल्लेख केला होता.

पारंपरिक मच्छीमारांचे म्हणणे आहे की, एलईडी मासेमारीसाठी मोठ्या प्रमाणावर ६०-१५० केव्हीए क्षमतेचे जनरेटर वापरण्यात येतात. हे तेजस्वी दिवे माशांच्या मोठ्या समूहांना आकर्षित करतात आणि अपरिपक्व माशांचाही संहार होतो, ज्यामुळे समुद्री परिसंस्थेवर गंभीर परिणाम होतो. जप्त करण्यात आलेल्या जहाजाच्या मालकाची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही. मात्र, मत्स्यव्यवसाय विभागाकडून अधिक तपास सुरू असून, लवकरच आणखी अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या कारवाईनंतर एलईडी मासेमारीच्या बंदीची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे, यावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मच्छीमार संघटनांनी वारंवार गस्त घालण्याची आणि कठोर दंडाच्या तरतुदी करण्याची मागणी केली आहे. उच्च न्यायालयानेही या प्रकरणाची दखल घेतली असून, बेकायदेशीर मासेमारी पद्धती आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या कार्यपद्धतीसंदर्भात लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणानंतर मत्स्यव्यवसाय विभाग आणि तटीय पोलिसांनी किनारपट्टीवर विशेषतः बेकायदेशीर मासेमारी होत असलेल्या भागांमध्ये अधिक कठोर देखरेख ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आगामी काळात एलईडी मासेमारी रोखण्यासाठी अधिक कठोर कारवाई करण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कुणाल कामराच्या स्टुडिओची मोडतोड

मुंबई, दि. २४ :

▶ एकनाथ शिंदेंवरील गाणे भोवले; २० जणांना ताब्यात, शिवसैनिक आक्रमक

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील एक गाणे आपल्या स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये सादर केल्यामुळे कॉमेडियन कुणाल कामरा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. याप्रकरणी राज्यातील वातावरण चांगलंच तापले असून शिवसेना आक्रमक झाली आहे. शिवसैनिकांनी मुंबईतील ज्या ठिकाणी कामराच्या शोचं चित्रिकरण झाले त्या सेटची तोडफोड केली. कामराविरोधात एफआयआर देखील दाखल करण्यात आला आहे. तर विरोधकांनी संधी सोडलेली नसून चोरी करणारे गद्धारच असतात, असे म्हटले आहे. दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद विधानसभेत उमटले.

माहितीनुसार, कुणाल कामराने त्याच्या स्टँड-अप शोमध्ये दिल तो पागल है सिनेमामधील 'मेरी नजर से तुम देखो तो' हे लोकप्रिय गाणे काही बदल करून गायले. यामध्ये 'मेरी नजर से तुम देखो तो गद्दार नजर वो आये' असे म्हटले होते. याद्वारे त्याने अलीकडच्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात घडलेल्या घडामोडींचे (ज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्षातील फुटींचा समावेश होता) विनोदी शैलीत वर्णन केले. याच गाण्यात त्याने शिंदे यांचे थेट नाव न घेता त्यांचा उल्लेख 'गद्दार' असा केला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच शिवसेना आक्रमक झाली आणि खार परिसरातील स्टूडिओ आणि यूनिकॉन्टिनेंटल हॉटेलमध्ये तोडफोड केली. या प्रकरणी खार पान २ ▶

सीडीआर, बँक खात्याची चौकशी होणार

कुणाल कामराचा बोलवता धनी कोण आहे? कारण घटनाक्रम देखील लक्षात घेतला पाहिजे. काही ठराविक ट्वीट केले गेले आहेत. सर्व विषयांचे गांभीर्य लक्षात घेता कुणाल कामराचे सीडीआर तपासले जातील, सर्व कॉल रेकॉर्ड तपासले जातील. बँक खात्याची चौकशी केली जाईल, याचा सुत्रधार कोण? आणि असेल तर त्याची देखील चौकशी केली जाईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली आहे.